साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–शुभम मिलिंद बढीये.
वय:–२९ वर्ष, व्यवसाय–मजुरी
राह.पिपरा,ता.उमरेड,जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री व्ही.यु.मिरचे यांच्या मार्फत</u>**

**१.** मी आरोपींना ओळखतो. घटना दिनांक १८/०५/२०१९ रोजीची आहे. सदर घटना ही बेला आठवडी बाजार येथे ५.०० ते ५.३० च्या दरम्यान सायंकाळी घडलेली आहे. त्यावेळी मी बाजार करित असतांना मला मागुन फकिरा बावने याने रॉडने मारले आणि त्यानंतर आकाश याने चाकुने माझ्या डाव्या हातावर व मांडीवर वार केला. त्यानंतर मारतेवेळी धनराज बावणे याने मला पकडून ठेवले होते. मला मारल्यामुळे मी चक्कर येउन पडलो त्यानंतरसुध्दा मला आरोपीने डोक्यावर रॉडने मारले. मारल्यानंतर मी धावत सुटलो व एका गल्लीमध्ये जाउन पडलो. त्यानंतर मी त्या गल्लीत पडलो असता त्यावेळी आकाश ढोक यांनी पाठीमागुन कमरेखाली चाकुने वार केला. त्यानंतर तेथून त्यांनी पळ काढला. त्यावेळी मी तेथे पडुन असतांना राहुल कांबडे, अनिकेत तळवेकर यांनी मला उचलुन टु व्हीलरने सरकारी दवाखाना बेला येथे नेले व तेथुन मला रेफर करून नागपुरला श्री विघ्नहर्ता हॉस्पीटलमध्ये नेले. त्यानंतर मी तेथे चार दिवस भरती राहीलो असता तेथे माझ्यावर उपचार केला व माझ्या हाताचे,मांडीचे व डोक्याचे ऑपरेशन झाले. पोलिसांनी माझ्याकडे दवाखाण्यात येउन चौकशी केली होती. पोलिसांनी मला दवाखाण्यात नेतेवेळी विचारपुस केली व मला फोटो दाखवुन विचारले की, तुला यांनी यांनी मारहाण केली का. त्यावेळी मी काही बोलण्याच्या याच्यात नव्हतो. त्यावेळी पोलिसांनी चौकशी करून माझे बयाण घेतले होते. त्यानंतर माझे न्यायालयामध्ये बयाण घेतले होते. आता मला न्यायालयात घेतलेले बयाण दाखविण्यात आले त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे त्यास **नि.क्र.०९** देण्यात आला. ज्या चाकुने व रॉडने मला मारले होते ते दाखविल्यास मी ओळखू शकतो.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयास विनंती करून सांगितले की, सदर चाकू व रॉड सि.ए.परिक्षणासाठी पाठविलेला असल्याने व तो न्यायालयात दाखल केलेला नसल्यामुळे सदर मुद्देमाल दाखल करण्याकामी विचारपुस करण्याकरिता सरतपास तहकूब करण्याची विनंती केली. सबब सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरून सरतपास तहकूब करण्यात आला.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.२५–०२–२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड